दिनांक: ०५/०९/२०१८

## सभेचे इतिवृतांत

विषय: फिश मार्केट, चिराबाजारमधील मासळी विक्रेत्यामहिला/ रहिवासी/ गाळेधारकांसोबत दि. १३.०८.२०१८ रोजी घेण्यात आलेल्या सभेचे इतिवृतांत

फिश मार्केट, चिराबाजारमधील मासळी विक्रेत्यामहिला/ रहिवासी/ गाळेधारकांसोबत दि. १३.०८.२०१८ रोजी दुपारी २ वाजता गोवन संस्था, जेएसएस रोड, मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत एमएमआरसीएलचे खालील नमूद केलेले अधिकारी उपस्थित होते.

- श्रीमती. माया पाटोळे, महाव्यवस्थापक (पु व पु)
- श्रीमती. संगीता वराडे, उप महाव्यवस्थापक (पु व पु) तथा तहसीलदार
- श्री. अभिजित इंगळे, मे. कॅटापुल्ट रियालिटी कन्सल्टंसी

तसेच, सदर सभेस पुढील मान्यवर उपस्थित होते:

- मा. सौ. हेमांगी वरळीकर, मा. उपमहापौर, मुंबई
- श्री. पांडुरंग सकपाळ, विभाग प्रमुख- कुलाबा विधानसभाक्षेत्र

श्रीमती. माया पाटोळे यांनी कोळी भगिनींचे स्वागत केले व तेथील उपस्थित अधिकाऱ्यांची ओळख करून सभेस सुरवात केली. यापूर्वी झालेल्या बैठकीत मांडलेले मुद्दे श्रीमती. माया पाटोळे यांनी पुनश्चः स्पष्ट केले.

कोळी भगिनींना सद्यस्थितीत वापरात असलेल्या चिराबाजारमधील त्यांच्या जागेबाबतची पात्रता निश्चित करण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही पुरावे उपलब्ध नसल्याने मासळी महिलांना अनिवासी भाडेकरू म्हणून स्विकारताना अडचणी येत आहेत असे स्पष्ट केले. तथापि, चिराबाजार येथील मासळी बाजार अनेक वर्षांपासून खाजगी जागेमध्ये भरविला जात आहे व तेथील मासळी विक्रेते दर दिवसाप्रमाणे मालकांना भाडे देत होते. सदर मार्केटमधील ओटे/ गाळे हे मालकी स्वरूपाचे नसून सदर गाळे/ ओट्यावरील मालकी/ भाडेकरू असल्याचे सिद्ध करण्यासाठी आवश्यक पुरावे कोणाकडे उपलब्ध नाहीत.

स्थानिक, नागरिक व विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी गिरगाव-काळबादेवी परिसरातील नागरिकांसाठी तात्पुरत्या स्वरुपात देखील बाजार उपलब्ध करणे आवश्यक आहे अशी मागणी केली. स्थानिक मागण्या विचारात घेऊन एमएमआरसीएलने तयार केलेल्या पुनर्वसन धोरणानुसार त्याच ठिकाणी कायमस्वरूपी मासळी बाजार स्थापन करणेची तरतूद केलेली आहे. तसेच स्थानिक नागरिकांची निकड विचारात घेवून शासनस्तरावर व महापालिकेकडे पाठपुरावा करून बंगाली शाळेची जागा तात्पुरत्या मासळी बाजाराकरिता उपलब्ध करून घेतली आहे व त्या ठिकाणी तात्पुरता बाजार उभा करणेचे काम प्रगतीपथावर असल्याचे स्पष्ट केले. बंगाली शाळेच्या इमारतीत तात्पुरत्या कालावधीकरिता मासळी विक्री करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा जसे कि, सद्यस्थितीत जेवढे ओटे आहेत त्याच आकारमानाचे तेवढेच ओटे डागडुजी करून उपलब्ध करण्यात आली आहेत. तसेच तेथे टोयलेट- बाथरूमची, दिवा-बत्ती व पाणी याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे.

कोळी भगिनींनी (मासळी विक्रेता मंडळ) तात्पुरत्या कालावधीकरिता देण्यात आलेल्या बंगाली महापालिकेच्या इमारतीतील जागा मान्य करावी व एमएमआरसीएल समवेत तात्पुरते करारपत्र करावे अशी विनंती महाव्यवस्थापक (पु व पु) यांच्या मार्फत करण्यात आली.

चर्चेच्या अनुषंगाने मासळी विक्रेता/ रहिवाशी/ गाळेधारक यांनी खालील प्रश्न उपस्थित केले:

| अ.क्र. | उपस्थित केलेले प्रश्न/मुद्दे | एमएमआरसीएलकडून केलेले स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १. | मासळी विक्रीकरिता तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येणारी बंगाली शाळेतील जागा सर्व कोळी महिलांना अमान्य आहे. त्यामुळे सर्व कोळी महिलांना भाडे देण्याची विनंती करण्यात आली. | सद्यस्थितीत असणाऱ्या मासळी बाजाराच्या क्षेत्रफळानुसार भाडे देता येईल. वैयक्तिक स्वरुपात भाडे देता येणार नाही तथापि आपण सर्व मासळी विक्रेत्यांचे विश्वस्त मंडळ स्थापन करावे. बाजारभावाप्रमाणे साधारणपणे सद्यस्थितीतील मासळी बाजारस रु. ४,५०,००० इतके भाडे देय होईल. सदरची रक्कम मासळी विक्रेता मंडळास अदा करता येईल. एमएमआरसीएलणे असे आवाहन केले कि, आपण मासळी विक्रेता मंडळाच्या नावाने बँकेत खाते उघडावे व आपल्या मंडळातील दोन सदस्यांना करारनामा करणेकरिता प्राधिकृत करावे. |
| २. | मासळी विक्रेत्या महिलांच्या जीवनमानाचा विचार करता मेट्रो प्रशासनामार्फत देण्यात येणारी रक्कम खूपच कमी आहे तरी सदरबाब वरिष्ठांसमवेत चर्चा करून निर्णय घ्यावा अशी विनंती केली गेली. | सदरबाब मेट्रो प्रशासनाच्या वरिष्ठांना कळविण्यात आली असून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल. |

मा. सौ. हेमांगी वरळीकर व श्री पांडुरंग सकपाळ यांनी मासळी विक्रेत्यांना भाडे देण्याची केलेली मागणी रास्त आहे. त्यामुळे भाडे स्वरुपात देण्यात येणारी रक्कम ही समाधानकारक असावी असे स्पष्ट करण्यात आले. सदर मुद्याच्या अनुषंगाने पुनश्च सभा घेऊन लवकरात लवकर तोडगा काढण्यात यावा अशी विनंती केली गेली व सदर सभा संपुष्टात आली.

यानंतर श्रीमती. माया पाटोळे यांनी सर्वांचे धन्यवाद मानले.